# सोलापूर तालुका पोलीस स्टेशन, सोलापूर ग्रामीण

दुरध्वनी /फॅक्सनं. ०२१७-२७३२०१७, ई मेल : ps.solapurtaluka@gmail.com


---

## प्रेस नोट दि. १२/०३/२०२०

**अंतर जिल्हा सोलापूर, सांगली, कोल्हापूर येथे घरफोडी करणारी टोळीतील सदस्यास अटक करून त्याच्याकडुन 3,25,000/- किमतीच्या सहा L.E.D. Tv हस्तगत करण्यात आले आहे.**

--oo--

सोलापूर तालुका पोलीस स्टेशन येथील तसेच वैराग पोलीस स्टेशन येथील विशेष पथक पोलीस स्टेशन येथे दाखल असलेल्या गुन्हयाचा तपास करत असताना हददीतील राहणारा वैभव नवनाथ गुरव, रा.मार्डी, ता. उत्तर सोलापूर याचा घरफोडीच्या गुन्हयामध्ये संशय आल्याने व त्याबाबत बातमीदारा मार्फत खात्रीशिर माहिती प्राप्त झाल्याने वैभव गुरव यास पुणे येथुन ताब्यात घेण्यात आले होते. सोलापूर तालुका पोलीस स्टेशन येथे दाखल गु.र.न ९८/२०२० या घरफोडीच्या गुन्हा केल्याचा सशंयावरुन त्यास सदर गुन्हयामध्ये अटक करण्यात आले आहे.

**गुन्हयाच्या तपासामध्ये वैभव नवनाथ गुरव, रा. मार्डी, ता. उत्तर सोलापूर याने व त्याच्या साथीदारानी सोलापूर, सांगली तसेच कोल्हापूर येथे घरफोडया केले असल्याचे तपासामध्ये निष्पन्न झाले असुन आरोपी वैभव गुरव याच्याकडुन सॅमसंग कंपनीच्या एक ५४ इंचाची व एक ५३ इंचाची, सोनी कंपनीची ४२ इंचाची व्हिडीओकॉन कंपनीची ४२ इंचाची, लॉईड कंपनीची ३२ इंची टिव्ही, पॅनोसोनिक कंपनीची एक ३२ इंची अश्या सहा L.E.D. Tv 3,25,000/- अंदाजे रु किमतीच्या Tv हस्तगत करण्यात आल्या असुन त्याच्याकडे गुन्हयाचा व त्याच्या इतर साथीदाराचा अधिक तपास चालु आहे. सोलापूर तालुका पोलीस स्टेशन येथे दाखल गुन्हयाचा तपास पो.ना. सय्यद हे करत आहोत.**

सदरची कामगिरी ही श्री. मनोज पाटील, पोलीस अधिक्षक सो, सोलापूर ग्रामीण, मा. अप्पर पोलीस अधिक्षक, श्री. अतुल झेंडे , श्री. प्रभाकर शिंदे, उप विभागीय पोलीस अधिकारी सोलापूर विभाग सोलापूर, यांच्या मार्गदर्शना मध्ये सोलापूर तालुका पोलीस ठाणेकडील पोलीस निरीक्षक सुहास जगताप व सपोनि अनिल देवडे, पोसई दळवी, सपोफौ/शेख, पो.ना./कोरे, पोकॉ/कोळेकर, पोकॉ/गायकवाड, पो.ना.सय्यद, पोकॉ/बिराजदार, पोकॉ/सोलंकर, पोकॉ/फडतरे, पोकॉ शेख, तसेच वैराग पोलीस ठाणेकडील पोना/हेंबाडे, पोकॉ/मुंडे व सायबर पोलीस ठाणेकडी पोकॉ/अत्तार, पोकॉ/माळी यांनी सदरची कामगिरी पार पाडली आहे.

**प्रति,**

**मा. संपादक,**

**नमुद बातमी आपले लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द होणेस विनंती आहे.**

